"सामाजिक न्याय प्रस्थापनेत मराठवाड्यातील शासनमान्य अनुदानित वृध्दाश्रम योजनेचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती पदविसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक

सपना ज्ञानोबा डिगोळे

(राज्येशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. कदम एम. आर.

शिवाजी कॉलेज, कंधार.

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड.

फेब्रुवारी -२०२४

प्रस्तावना

१.१ प्रास्ताविक :

प्रसिद्ध राजकीय विचारवंत रुसो यांनी "मनुष्य हा जन्मतः स्वतंत्र आहे"असे म्हटले आहे.भूतलावरील मानवी समजाचा विचार करता असे आढळते की,सर्वच देशातील समाजव्यवस्थेची न्याय आणि समतेच्या तत्वावर उभारणी करण्यासाठी दीर्घकाळ पर्यन्तचा संघर्ष करावा लागला आहे.आज जगात विकसित म्हणून नावाजलेले जे देश आहेत त्या देशांमधील समाज रचना ही न्यायतत्वावर आधारित नव्हती.तेथे गुलामगिरीसारख्या अमानवी प्रथांचे वर्चस्व होते.एवढेच नव्हे तर अनेकांनी या प्रथेचे समर्थनही केल्याचे दाखले उपलब्ध आहेत.स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सन्मान आणि समानधिकार मिळविण्यासाठी इंग्लंड सारख्या देशातसुध्दा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात देखील महिलांनी लढा दिला होता.विविध स्वरुपात असलेल्या शोषणाविरुद्धचे लढे अजूनही जगभर सुरूच आहेत असे दिसते.दक्षिण आफ्रिकेमध्ये वर्णव्यवस्थेचे आसलेल्या प्रभूत्वाविरुद्ध गौर वर्णीयांकडून कृष्णवर्णीयांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकिविरुद्ध महात्मा गांधीचा लढा हा तर जग प्रसिद्धाच आहे.देशोदेशीच्या समाजव्यवयस्थेत मानवी समाजाची विभागणी ही जात,धर्म,वंश,वर्ण यासारख्या संकुचित विचार आणि धारणांच्या आधारावर आढळते.भारतीय समाजरचना ही याला अपवाद नाही.

वर्णाव्यवस्था आणि जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे एक अविभाज्य वैशिष्ट आहे.चातूवर्णव्यवस्थेमुळे भारतीय समाज ब्राह्मण,क्षत्रीय,वैश्य आणि शूद्र अशा चार भगत विभागला गेला असून या विषमतावादी विभाजणाला धर्मसंहिता मधुन आधारभूत समर्थन प्राप्त झाले आहे.शतकानुशतके ही व्यवस्था येथे रूढ असून याचे पालन होत आले आहे.हे खरे असले तरी काही बुद्धिवादी,मानवतावादी आणि विवेकवादी अशा समाज सुधारकांनी,विचारवंतांनी या समाज व्यवस्थेतील वैगुण्यावर बोट ठेवत ही समाजव्यवस्था,समता,स्वातंत्र्य,बंधुता आणि न्याय या मूल्यावर उभारली गेली पाहिजे असा आग्रह धरला आहे.ब्रिटिशकालीन भारतात अनेकांनी त्यासाठि काम केले आहे.सामाजिक समता की स्वातंत्रयाचे लाभ सर्वांना मिळणार नाहीत असे त्यांना वाटत होते.एक

माणूस म्हणून सर्वांना सन्मानाने जगण्यासाठीची परिस्थिती निर्माण झाली पाहिजे यासाठी राष्ट्रीय नेतृत्त्व प्रयत्नरत होते.ही बाब घटनसमितीत झालेल्या चर्चा आणि मांडले गेलेले ठराव या वरुन पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उदीष्ट्यांचा ठराव भारतीय संविधांनाच्या उदेश पत्रिकेतहि विषमतावादी समाजरचणेएवजी समतावादी समजरचणा निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या मूल्यांचा उदघोष करण्यात आला आहे.संविधनाचा अंगीकार केल्यानंतर भारतीय संसदेणे आणि घटक राज्यांच्या विधिमंडळानी वेळोवेळी सामाजिक,राजकीय,आणि आर्थिक न्याय निर्माणसाठीचे कायदे केले आहेत.तसेच वेगवेगळया समाज घटकांसाठी काही योजनांचा स्वीकार करून त्याद्वारा न्याय निर्माणचा प्रमाणिक प्रयत्न केला आहे.त्यांच्या फलश्रुतींच्या चिकित्सकपणे आढावा घेता यावा म्हणून"सामाजिक न्याय प्रस्थापनेत मराठवाड्यातील शासनमान्य अनुदानित वृद्धाश्रम योजनेचे योगदान :एक चिकित्सक अभ्यास"हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

१.२ संशोधनाची उद्दिष्टे :

सदरील शोध प्रबंध"सामाजिक न्याय प्रस्थापनेत मराठवाड्यातील शासनमान्य अनुदानित वृद्धाश्रम योजनेचे योगदान :एक चिकित्सक अभ्यास" यामध्ये संशोधनाची दिशा निश्चित करण्यासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१. सामाजिक न्यायाची संकल्पना अभ्यासणे .

२. सामाजिक न्यायाचा भारतीय आणि पाश्चिमात्य विचार अभ्यासणे .

३. सामाजिक न्याय प्रस्थापनेतील विविध शासकीय योजनेचा आढावा घेणे.

४. जेष्ठ नागरिकांच्या न्यायासाठी वृद्धाश्रमाचे योगदान अभ्यासणे .

५. जेष्ठ नागरिकांच्या समाजातील व कुटुंबातील स्थितीचा अभ्यास करणे.

६. सामाजिक न्यायाची अंमलबजावणी कितपत झाली याचा शोध घेणे.

१.३ संशोधनाची ग्रहितकृत्ये :

प्रस्तूत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित केली आहेत.

१. सामाजिक न्याय प्रस्थापनेत भारतीय विचारवंताचे योगदान आहे.

२. सामाजिक न्याय प्रस्थापनेत शासकीय वृद्धाश्रमाचे योगदान आहे.

३. सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठीच्या शासकीय योजनाच्या अंमलबजावणीतून समाजात जेष्ठ नागरिकांचे जीवनमान उंचावले आहे.

४. भारतीय समाजतील संयुक्त कुटूंब पध्दतीच्या ऱ्हासामुळे वृद्धाच्या समस्येत भर पडली आहे.

१.४ संशोधन पध्दती :

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक व ग्रंथालयीन संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येत असून संशोधनासाठी निश्चित केलेल्या क्षेत्रात सर्वेक्षनात्मक पध्दतीने तथ्य संकलित करून त्याचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण व निष्कर्ष मांडले जातील.

१.५ संशोधनाची मर्यादा :

सदरील संशोधनाचा अभ्यास हा मराठवाडा पुरता मर्यादित असून त्यामध्ये शहरी व ग्रामीण भागातील शासनमान्य अनुदानित वृद्धाश्रमाचा अभ्यास करण्यात येईल.स्वयंसेवी संस्थाद्वारा संचलित विनाअनुदानित असा वृद्धाश्रमाचा अभ्यास यात समाविष्ट नाही.

१.६ नमूना निवड :

सदरील संशोधनासाठी नमूना पध्दतीने मराठवाडयातील एकूण ०८ वृद्धाश्रमाचा अभ्यास करण्यात येईल.या वृद्धाश्रमातील एकूण १०० वृद्धाचा अभ्यास करण्यात येईल.

१.७ तथ्य संकलन :

"सामाजिक न्याय प्रस्थापनेत मराठवाड्यातील शासनमान्य अनुदानित वृद्धाश्रम योजनेचे योगदान :एक चिकित्सक अभ्यास" या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येईल.प्राथमिक साधनात मराठवाड्यातील एकूण ०८ वृद्धाश्रमातील एकूण १०० वृध्दांची प्रत्यक्ष संरचित प्रश्नावलीच्या माध्यमामातून तथ्य संकलीत करण्यात येईल.दुय्यम सामग्री मध्ये

अहवाल,जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन,मासिके,पाषिके व साप्ताहिके तसेच वर्तमानपत्रांचा समावेश त्यामधून माहिती संकलित करण्यात येईल.

१.८ प्रकरणांची रचना :

सदरील संशोधन एकूण सात प्रकरणामध्ये विभागण्यात येईल.

- **प्रकरण पहिले : प्रस्तावना:**

प्रस्तूत प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची ग्रहितकृत्ये, संशोधन पध्दती,संशोधनाची मर्यादा,नमूना निवड,तथ्य संकलन इत्यादीचा अभ्यास करण्यात येईल.

- **प्रकरण दुसरे: सामाजिक न्यायाची संकल्पना एक विवेचन :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये सामाजिक न्यायाचा अर्थ,व्याख्या,उद्दिष्टे,महत्व,सामाजिक न्यायाची संकल्पना,सामाजिक न्याय या बद्दल विद्वानांची मते, सामाजिक न्याय आणि भारतीय संविधान इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

- **प्रकरण तिसरे: समाज सुधारकांचे सामाजिक न्याय प्रस्थापनेतील कार्य:**

प्रस्तूत प्रकरणामध्ये १९व्या शतकाच्या प्रारंभीची राजकीय,सामाजिक, धार्मिक व आर्थिक स्थिति, समाजसुधारकांचे शिक्षण विषयक कार्य, स्त्रीदास्य विमोचन विषयक कार्य,जातीप्रथा व अस्पृश्यता निर्मूलन विषयक कार्य,आरक्षण आणि सामाजिक न्याय इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

- **प्रकरण चोथे:सामाजिक न्यायाच्या विविध शासकीय योजना – एक दृष्टिक्षेप :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय योजेनेचा आढवा घेण्यात येईल.जसे की शिक्षण व प्रशिक्षण,आर्थिक उन्नतीसाठी,रोजगार,अपंग कल्याण,सामाजिक एकात्मता,सामाजिक उपाय,पुरस्कार,जेष्ठ नागरिक इ.

- **प्रकरण पाचवे : वृध्दाश्रमाची कारणे व आवश्यकता :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये वृध्दाश्रमाची उत्पत्ती, प्रकार, कारणे, स्वरूप, उदेश, वृध्दाश्रमाचा इतिहास इ. घटकाचा अभ्यास करण्यात येईल.

- **प्रकरण सहावे : वृध्दाश्रम या योजनेचे सर्वेक्षनात्मक अध्ययन :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या मराठवड्यातील शासकीय अनुदानित वृध्दाश्रमातील १०० वृध्दांची निवड करून संरचित प्रश्नावलीद्वारे तथ्य संकलित करून त्याचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करण्यात येईल.प्राप्त तथ्यांना तालिकाबध्द करून त्याचे विश्लेषण करण्यात येईल.

- **प्रकरण सातवे : सारांश व निष्कर्ष:**

प्रस्तूत प्रकरणामध्ये संपूर्ण संशोधनाचा थोडक्यात सारांश व संशोधनाअंती आलेले निष्कर्ष मांडण्यात येतील.

संदर्भ सूची:

१. डॉ. भोळे भा.ल.,राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण,मनोहर पिंपळपुरे अँड कं.पब्लीशेर्स,नागपुर,ऑगस्ट,१९८८.

२. प्रा. पाटील बी.बी,२० व्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारनेचा इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे २००४.

३. डॉ. डोळे ना.य.,प्रमुख पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्ष, औरंगाबाद.

४. मुंशीलाल, कायदा व सामाजिक न्याय , लोकराज्य आक्टोंबर२००६.

५. देशपांडे भगवान, भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय, प्रबोनधन प्रकाशन, लातूर,२०००

६. डॉ बोधनकर सुधीर व प्रा. आलोणी विवेक, सामाजिक संशोधन पध्दती श्री. साईनाथ प्रकाशन , नागपूर ,२००३.

संशोधक
डिगोळे सपना ज्ञानोबा

मार्गदर्शक
डॉ.कदम.एम.आर
श्री शिवाजी कॉलेज कंधार